मा.उच्च न्यायालयाच्या विस्तारीत इमारतीमधील कॉन्फरन्स हॉलमध्ये नव्याने व्हिडीओ कॉन्फरन्सिग यंत्रणा कार्यान्वित करण्याकरिता रु. ३,२०,३२,९८७/- इतक्या रकमेच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्र. संगणक- २०१५/प्र.क्र. ६३/का.७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०७ मार्च, २०१८.

वाचा :- १) प्रबंधक, मा. उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई यांचे पत्र क्र.C.S./ Conference /२१८३, दिनांक ११.०८.२०१५.
२) प्रबंधक, मा. उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई यांचे पत्र क्र.C.S./ Conference /२४८२, दिनांक ०३.०९.२०१६.

प्रस्तावना :-

मा.उच्च न्यायालयाच्या विस्तारीत इमारतीत कार्यान्वित करण्यात आलेली VC यंत्रणा जुनी व कालबाह्य झाली असल्याने माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या दिनांक १.८.२०११ च्या शासन निर्णयानुसार सदर यंत्रणा निर्लेखित करुन नवीन यंत्रणा कार्यान्वित करण्याची तातडीने आवश्यकता असल्याने मा.उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंग यंत्रणेबाबतचा रु. ३,२०,३२,९८७/- इतक्या रकमेचा प्रस्ताव संदर्भ २ नुसार शासनास सादर केला होता. सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान विभाग) यांचे शासन निर्णय दिनांक २३.०९.२०११ अन्वये सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यासाठी विभागाच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीची बैठक दिनांक ३०.१२.२०१७ रोजी घेण्यात आली व त्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

दरमान वित्त विभागाचे दिनांक २९.०१.२०१८ रोजीच्या परिपत्रकानुसार १.२.२०१८ नंतर करण्यात येणाऱ्या खरेदीवर निर्बंध टाकण्यात आला. त्यानुसरुन वित्त विभागास सदर प्रस्तावास निर्बंधातून सुट मिळण्याची विनंती करण्यात आली. त्यास वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ६७/१८/कोषाप्रशा-५, दिनांक १.३.२०१८ अन्वये विशेष बाब म्हणून खरेदीवरील निर्बंधातून सुट देण्यात मान्यता दिली आहे. या पार्श्वभूमीवर खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

मा.उच्च न्यायालयाच्या विस्तारीत इमारतीमधील कॉन्फरन्स हॉलमध्ये नव्याने व्हिडीओ कॉन्फरन्सिग यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबतचा रु. ३,२०,३२,९८७/- (रु. तीन कोटी वीस लाख बत्तीस हजार नवशे सत्याऐंशी फक्त) इतक्या रकमेच्या प्रस्तावास विशेष बाब म्हणून या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. मा.उच्च न्यायालयाच्या विस्तारीत इमारतीमधील कॉन्फरन्स हॉलमध्ये नव्याने व्हिडीओ कॉन्फरन्सिग यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी तांत्रिक बाबी जसे, यंत्रणा कार्यान्वित करणे व दृकश्राव्य वस्तू बनविणे अंतर्भूत असल्याने, मा. उच्च न्यायालयाने उप अभियंता, शहर विद्युत उपविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई-३२यांचे मार्फत शासनाने विहित केलेल्या पध्दतीने नवीन व्हिडीओ कॉन्फरन्स यंत्रणा कार्यान्वित करावी.

३. सदर अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर झाले आहे त्याच प्रयोजनासाठीच खर्च करण्यात यावे.

४. सदर निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित नमुन्यात त्वरीत शासनास सादर करावे.

५. याप्रित्यर्थ होणारा खर्च "मागणी क्र. जे-२, २०५२ सचिवालय सर्वसाधारण सेवा, (००) विधी व न्याय विभाग, (००) (०२) ई-गव्हर्नन्स प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी तरतूद (२०५२ ५११६) या लेखाशिर्षाखाली "१७ संगणक खर्च" या उदिष्टांतर्गत वित्तीय वर्ष सन २०१७-१८ करिता मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागविण्यात यावा.

६. हा शासन निर्णयवित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-१ उप विभाग-२ मधील अ.क्र.२७ (अ) नियम क्र. ७६ मधील २ व ३ या अटींच्या अनुषंगाने माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या सल्ल्याने व त्यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार तसेच प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक६७/१८/कोषाप्रशा-५, दिनांक १.३.२०१८ अन्वये विशेष बाब म्हणून खरेदीच्या निर्बंधातून सुट मिळण्यास सहमतीत दर्शविल्यातून निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३०७१५१९५७१५१२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Amogh
Shyamkant Kaloti

Digitally signed by Amogh Shyamkant Kaloti
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f733daf00a6028414c43d0cc10d82acab3b732c4edd56e818f8a3b355588753, serialNumber=9ebeebf21dc54ceec51e6d5ffc84bb94ca6af89497279007d66e97dc13547037, cn=Amogh Shyamkant Kaloti
Date: 2018.03.07 15:20:51 +05'30'

(अ. श्या. कलोती)
विधि सल्लागार-नि-सह सचिव.

प्रति,

१) प्रबंधक मा. उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई

२) प्रबंधक (अर्थसंकल्प व वित्त), मा. उच्च न्यायालय, मुंबई

३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१/२,मुंबई/नागपूर,

४) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई,

५) प्रधान सचिव व विधी परामशी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.

६) वित्त विभाग (व्यय-५, कोषाप्रशा--९)

७) संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय,मुंबई,

८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

९) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,

१०) लेखा अधिकारी, मुंबई. (२ प्रती),

११) सह सचिव (आस्थापना), कार्यासन अधिकारी/कार्यासन २३ व २४ विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,

१२) निवड नस्ती/का.७.